जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली पेण नगरपरिषदेवर धडक मोर्चा काढण्यात आला. पेण नगरपालिकेने १५ दिवसात स्वच्छ पाणीपुरवठा न केल्यास भाजपा आंदोलन छेडण्यात येईल असा इशारा भाजपचे जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांनी दिला.

यावेळी पुढे बोलताना भाजपा जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांनी पेण नगरपरिषद प्रशासनासह सत्ताधाऱ्यांच्या मनमानी कारभारावर घणाघाती टिका केली. पेण शहरातील रहिवाशांना विशेषतः महिलांना अनेक वर्षांपासून पाणीपुरवठ्याबाबत अन्य नागरी समस्यांना सामोरे जावे लागत असून न्याय हक्कासाठी आज त्यांना रस्त्यावर उतरावे लागले आहे. शहरात १२ महिने गढूळ पाणीपुरवठा होत आहे. स्वच्छ पाणी नगरपालिकेने दिलेच पाहिजे तो जनतेचा हक्क आहे. मुख्याधिकाऱ्यांनी १५ दिवसांच्या आत आतापेक्षा जास्त स्वच्छ पाणी पुरवठा करण्याचे आश्वासन

... आरोपावर होत आहे. ... जनतेला सुविधा देणे जमत नसेल तर सत्ता सोडा ... असे आवाहन त्यांनी सत्ताधाऱ्यांना ... टिका करताना आमदार प्रशांत ठाकूर ... न.पा.तील सत्ताधारी काँग्रेसने जनतेला ... काम केले असून नागरिकांच्या हिताचा गळा घोटला आहे. ... मनमानी सत्ता राबवित आहेत ... नावाखाली ठेकेदारांचे खिसे भरण्याचे काम केले ... आहे ते कोणासाठी ? छोटयाशेठ साठी का ? असा सवाल त्यांनी उपस्थित केला. जनतेला सुविधा द्या असे आवाहन करत ... भावाभावांच्या भांडणात जनतेला वाऱ्यावर सोडले आहे ... आरोप त्यांनी केले. पेण शहरातील दहशत संपविण्यासाठी भाजप ... पुढे आले आहे. सर्वसामान्यांना न्याय देण्यासाठी भाजप सदैव






# डॉ. डॅफनी पिल्लई यांना सॅव्ही हॉनर सेलिब्रेटिंग सक्सेस अवॉर्डने करण्यात आले सन्मानित

पनवेल दि.२६ (वार्ताहर)- डॉ. डॅफनी पिल्लई ह्यांचा सॅव्ही मॅगझिन यांनी आयोजित केलेल्या पंचतारांकित समारंभात ताज, सांताक्रूझ येथे सॅव्ही हॉनर सेलिब्रेटिंग सक्सेस अवॉर्ड बहाल करून सत्कार करण्यात आला.

डॉ. डॅफनी पिल्लई ह्या गेली ३० वर्षे शिक्षण क्षेत्रातील अग्रणी आहेत. त्या महात्मा शिक्षण संस्थेच्या व्यवस्थापक मंडळाच्या अध्यक्ष आहेत आणि पिल्लई ग्रुप ऑफ इंस्टीट्युशनच्या सहसंस्थापिका आहेत. ह्या संस्थेच्या ४८ विद्या शाखा आहेत. या विविध शाखेत ३५,००० विद्यार्थी दरवर्षी शिकत आहेत. हा सत्कार त्यांच्या शिक्षण क्षेत्रातील योगदानाप्रित्यर्थ त्यांना देण्यात आला. विशेष करून त्यांनी सामाजिक घटकातील वंचित महिलांच्या



सक्षमिकरणासाठी राबविलेल्या प्रौढशिक्षण मोहीम आणि कौशल्यविकास कार्यक्रम यासाठी केलेल्या योगदानासाठी होता. त्यांना दृढविश्वास आहे की 'महिला ह्या नैसर्गिकरित्या सक्षम आहेत कारण त्यांच्यात जननक्षमता आहे. त्यांना फक्त योग्य वातावरण उपलब्ध झाल्यास त्यांचे व्यक्तिमत्व फुलण्याची संधी मिळेल. आपले हे कर्तव्य व बांधिलकी म्हणून आपण सुद्धा सभोवतालील वातावरण अनुकूल करायला हवे'.डॉ. डॅफनी पिल्लई ह्यांनी सामाजिक क्षेत्रात केलेल्या योगदानासाठी 'ट्रॉफी व प्रशस्तीपत्रक' देऊन सन्मानित करण्यात आले. डॉ. डॅफनी पिल्लई ह्या सोरोप्टि मिस्ट इंटरनॅशनल मुंबई, चेंबूर ह्या आंतरराष्ट्रीय संस्थेच्या संस्थापक सदस्या सुद्धा आहेत. ही संस्था जागतिक संघटना असून स्त्रियांच्या कल्याणासाठी काम करते. तसेच शिक्षणाद्वारे महिला सक्षमीकरण करून त्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी काम करते.





# करंजा-कासवलेपाडा येथे समुद्राच्या ला...



करंजा दि. २६ (अमृत म्हात्रे) ... ग्रामपंचायत हद्दीत असलेला करंजा – का... रस्त्यामध्ये मोठ मोठे खड्डे पडले ... रस्त्यावरून प्रवास करणे धोक्याचे झाले ...

करंजा कासवलेपाडा हा रस्ता ... असल्याने लाटांनी या रस्त्याची ... प्रमाणात होत आहे तर रस्त्यामध्ये ... खड्डे पडले आहे. या रस्त्याला ... दगड टाकले आहेत हे दगड समुद्रा... खचून रस्ता खचण्याच्या मार्गावर ...